# महाराष्ट्र शासन
# शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
# ५ फायनान्स रोड, पुणे-१.

फोन नं. :- ०२० - २६१२५८०८
फॅक्स नं. :- ०२० - २६१२८९२०
ई मेल :- E-mail ID -govtpzp@yahoo.com

## अपंग/मागासवर्गीय अनुशेष विशेष भरती मोहीम
**जाहिरात क्र. ३/२०१२**

जाहिरात प्रसिध्द करण्याची वेळ - दुसरी

संदर्भ – १) या कार्यालयची जाहिरात क्र.१/२०१२ – रिक्त अंपग अनुशेष प्रसिध्द दिनांक ४/३/२०१२
२) या कार्यालयची जाहिरात क्र.२/२०१२ – रिक्त मागासवर्गीय अनुशेष प्रसिध्द दिनांक ४/६/२०१२

महाराष्ट्र शासन, शासन मुद्रण व लेखनसामग्री, मुंबई- ४ यांचे अंतर्गत शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांचेतर्फे खालील अंपग व मागासवर्गीय अनुशेषांच्या रिक्त पदाकरिता संदर्भ क्र. १ व २ अन्वये जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती सदरील जाहिरात सुधारीततरित्या पुनःश्च प्रसिध्द करणेत येत असून यापूर्वी संदर्भाकिंत जाहिरातीन्वये ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत ते अर्ज विचारात घेण्यांत येत असून सदर जाहिरातीत नमुद केलेली शैक्षणिक व तांत्रिक अर्हता प्राप्त करणारे उमेदवार तसेच अनुभवाचे प्रमाणपत्र न जोडलेल्या उमेदवारांनी पुनःश्च अर्ज करणे आवश्यक आहे.

शासन परिपत्रकानुसार अपंग व मागासर्गीय अनुशेष विशेष भरती मोहिमेतंर्गत (गट-क ) या संवर्गातील पदासाठी जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून टंकलिखीत केलेले विहित नमुन्यात अर्ज दिनांक ०१/११/२०१२ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत पोहचतील अशा त-हेने मा. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, ५ फायनान्स रोड, पुणे ०१. या पत्यावर संपूर्ण तपशिलासह पाठवावेत. तद्नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

### सरळसेवा भरतीने घोषीत पदे व अनुशेष

### अ) अपंग अनुशेष तक्ता

| अ.क्र | पदनाम | सुधारीत वेतनश्रेणी व पे बॅन्ड | पद संख्या | अंपग प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| गट - क | | | | | |
| १. | लिपिक - टंकलेखक | पी बी १ - रु. ५२०० – २०२०० ग्रेड वेतन - रु.१९००/- | ०१ | चलनवलन विषयक विकलांगता (अस्थीव्यंग) (BL,OA,OL) | इयत्ता दहावी उत्तीर्ण<br>टायपिंग - मराठी ३० प्र.श.मि. किंवा इंग्रजी ४० प्र.श.मि<br>एमएससीआयटी संगणक परिक्षा उत्तीर्ण |
| २. | बांधणी साहयकारी | पी बी १ - रु.५२०० – २०२०० ग्रेड वेतन - रु.१८००/- | ०२ | ०१ पद (क्षीणदृष्टी) (LV)<br>०१ पद चलनवलन विषयक विकलांगता (अस्थीव्यंग ) (OA,OL) | इयत्ता ९ वी उत्तीर्ण<br>सुदृढ शरीरयष्टी, अवजड काम करण्याची क्षमता, सामान्य बांधणी काम हातघडी,गॅदरिंग,काउटिंग, रॅपिंग, कॉलेटींग पेस्टिंग इ.बाबतचा मुद्रणालयातील प्रत्यक्ष कामाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>पुस्तक बांधणी या उदिमांचे प्रशिक्षण /आयटीआय पुस्तक बांधणी प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्णास प्राधान्य |
| गट – ड | | | | | |
| ३. | प्रक्रिया साहयकारी | पी बी १ - रु.५२०० – २०२०० ग्रेड वेतन - रु.१६५०/- | ०१ | श्रवण शक्तीतील दोष (HH) | इयत्ता ९ वी उत्तीर्ण<br>प्लेट लॉकिंग व अन-लॉकिंग करणे, प्लेटस स्वच्छ करणे, यंत्राची किरकोळ अडजेस्टमेंट करणे, यंत्रावर प्लेट लावणे,ठरवून दिलेल्या क्षमतेइतके उत्पदान देण्याची क्षमता, अवजड कामाची शारीरीक क्षमता,<br>प्लेट मेकर शिकाऊ उमेदवार किंवा आयटीआय परिक्षा उत्तीर्णांस प्राधान्य |

**(BL – Both Legs , OA – One Arms ,OL – One leg , LV – Low Vision, HH – Hearing Handicapped )**

## ब) मागासवर्गीय अनुशेष तक्ता

| अ.क्र | पदनाम | सुधारीत वेतनश्रेणी व पे बॅन्ड | पद संख्या | मागासवर्गीय अनुशेष प्रवर्ग | | | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ.ज | भ.ज.क | विमाप्र | |
| गट - क | | | | | | | |
| १. | लिपिक - टंकलेखक | पी बी १ - रु.५२०० – २०२०० ग्रेड वेतन - रु.१९००/- | ०२ | -- | ०१ | ०१ | इयत्ता दहावी उत्तीर्ण<br>टायपिंग - मराठी ३० प्र.श.मि. किंवा इंग्रजी ४० प्र.श.मि<br>एमएससीआयटी संगणक परिक्षा उत्तीर्ण |
| २. | बांधणी साहयकारी | पी बी १ – रु.५२०० – २०२०० ग्रेड वेतन - रु.१८००/- | ०१ | ०१ | -- | -- | इयत्ता ९ वी उत्तीर्ण<br>सदृढ शरीरयष्टी, अवजड काम करण्याची क्षमता, सामान्य बांधणी काम हातघडी,गॅदरिंग,काउटिंग, रॅपिंग, कॉलेटींग पेस्टिंग इ.बाबतचा **मुद्रणालयातील प्रत्यक्ष कामाचा तीन वर्षाचा अनुभव आवश्यक**<br>पुस्तक बांधणी या उदिमांचे प्रशिक्षण /आयटीआय पुस्तक बांधणी प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्णास प्राधान्य |

## अटि व शर्ती

१) **ज्या उमेदवारांनी यापुर्वी वरील पदासाठी अर्ज सादर केलेले आहेत व त्यांनी त्या पदासाठी नमूद केलेली तांत्रिक व शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली असेल त्यांनी पुनःश्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही.**
**तसेच ज्या उमेदवारांनी पूर्वी अर्ज केलेले असल्यास व सुधारीत जाहिरातीनुसार तांत्रिक, शैक्षणिक व अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले नसेल त्यांनी पुनःश्च अर्ज सादर करणे आवश्यक आहे.**

२) खालील पदांसाठी वयोमर्यादा जाहिरातीच्या दिनांकास,
१) **अपंगअनुशेष करिता** – १८ वर्षा पेक्षा कमी नसावे व ४५ वर्षा पेक्षा जास्त नसावे
२) **मागासवर्गीयअनुशेष करिता** - १८ वर्षा पेक्षा कमी नसावे व ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

३) उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. (शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे).

४) मागासवर्गीय अनुशेष पदाकरिता शासन नियमानुसार परिक्षा शुल्क म्हणून न्यायालयीन फी मुद्रांक (कोर्ट फी स्टॅम्प)/पोस्टल ऑर्डर अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
**लिपिक पदाकरिता रु. ७५/- व बांधणी साहयकारी पदाकरिता रु. १००/-**
- **धनादेश स्विकारले जाणार नाहीत.**

५) लेखी परिक्षा व मुलाखतीचे गुणांकन आणि मुलाखतीस व निवडीस पात्र होण्यासाठी किमान गुण :-
शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रनिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.१९/१०/२००७ नुसार लेखी परिक्षा,व्यावसायीक चाचणी परिक्षा व मुलाखतीच्या गुणांकनाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | पदनाम | लेखी परिक्षचे गुण | व्यावसायीक चाचणी ग्रुप | मुलाखतीचे गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | लिपिक-टंकलेखक | २०० | --- | -- | २०० |
| २. | बांधणी साहयकारी | ५० | ४० | १० | १०० |

६) अ) ज्या पदाच्या बाबतीत लेखी परिक्षा २०० गुणांची दर्शविली आहे तेथे लेखी परिक्षेसाठी प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान आणि अंकगणित प्रत्येकी ५० गुण अशी राहिल.
**ब) लिपिक-टंकलेखक पदांसाठी उमेदवारांची निवड मुलाखत न घेता लेखी परिक्षा घेण्यात येईल, लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड करण्यात येईल.**
**क) इतर पदांसाठी लेखी परिक्षा त्यांच्या शैक्षणिक अर्हते नुसार भाषा, सामान्यज्ञान, व गणित तसेच व्यायसायीक चाचणी नुसार राहील.**

७) **जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही किमान अर्हता आहे. ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही. याची नोंद घ्यावी.**

८) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेला बोलवण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही याची नोंद घ्यावी.

९) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्तीपूर्वी वैद्यकिय अधिकारी यांचेकडून वैद्यकिय तपासणी करुन घेण्यात येईल. वैद्यकिय तपासणीत अपात्र ठरल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१०) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार/एकात्मिक आदिवासी प्रकल्प/जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नावनोंदणी नुतनीकरण केलेली असल्यास नोंदणीपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

११) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभवाचा दाखला, जातीचा दाखला, अपंगत्वाचा दाखला, संगणक हाताळणी प्रमाणपत्र (MSCIT) तसेच आवश्यक ती कागदपत्रे/प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

१२) अनुभवाच्याबाबतीत तासिका, नियतकालिक, अर्धवेळ, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नसून अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

१३) विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखामार्फत पाठवावेत.

१४) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. १७/(२०००)/१२ दिनांक २८.३.२००५ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. १७/२०००/१२, दि. ०१/०७/२००५ नुसार कुटूंब लहान असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१५) अर्ज सादर करणा-या उमेदवाराने अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० % असलेबाबतचे सक्षम वैद्यकीय त्रिसदस्यीय समिती/वैद्यकीय बोर्डाने प्रमाणित केलेले अपंगत्वाच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६) जात प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि. १२/१२/२०११ मधील तरतूदीनुसार याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि.२५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपीमधील आदेशाच्या अधिन राहून तात्पूरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्या उमेदवाराची नियुक्ती पूर्वलक्षीप्रमाणे रद्द करण्यात येईल.

१७) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असलेल्या पदांकरिता परिक्षेत मराठी व हिंदी भाषा विषयांचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांनी एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

१८) उमेदवाराने विहित नमून्यामधील अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे. जी बाब अर्जदारास लागू होत नसेल तेथे लागू नाही असे नमूद करावे. अजर्दाराने त्याचा प्रवर्ग न चुकता नमूद करावा. अर्जदाराने अर्जात जो प्रवर्ग नमूद केला असेल त्याच प्रवर्गाकरिता अर्जदाराचा विचार करणेत येईल.

१९) आरक्षित पदासाठी अर्ज केला असल्यास सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र व शासन नियमानुसार विजा.अ, भ.ज.ब,भ.ज.क,भ.ज.ड, वि.मा.प्र. व इमाव या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट ( क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-याने दिलेले सन २०११-२०१२ साठी वैध असलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर केली तरच संबधित आरक्षणांचा लाभ दिला जाईल, अन्यथा आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही.

२०) निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/कागदपत्रे खोटी सादर केल्याचे आढळून आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२१) पद भरतीसाठी वेळोवळी बदल झाल्यास याबाबतची माहिती वृत्तपत्रांतून प्रसिध्द करण्यात येईल.

२२) निवड झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत त्यांचा परिविक्षाधिन कालावधी एक वर्षाचा असेल, या कालावधीत त्यांचे काम,वर्तणूक व उपस्थिती समाधानकारक असणे आवश्यक आहे.

२३) उमेदवारांची शासकिय सेवेसाठी निवड होऊन नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवा प्रवेशोत्तर परिक्षा, विभागीयपरिक्षा आणि इतर परिक्षा व प्रशिक्षण विहित संधीत, विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

२४) या जाहिरातीत नमुद केलेली पदसंख्या कमी,जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. प्रवर्ग निहाय प्रवर्गात बदल होण्याची शक्यता आहे.रिक्त पदाच्या उपलब्धता आणि आवश्यकतेनुसार नेमणुका केल्या जातील.

२५) उमेदवारांना स्वखर्चाने लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी हजर रहावे लागेल.

२६) लेखी परिक्षेचे अथवा मुलाखतीचे पत्र पोस्ट विभागाकडून उशिरा प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

२७) जाहिरातीतील पदांच्या भरती प्रक्रियेचा प्रशासनाचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तीक पातळीवर कोणाशीही . केला जाणार नाही.

२८) उमेदवार अर्ज करित असलेल्या कार्यालयाच्या आस्थापनेवर कोणत्याही पाळित (शिफ्ट) मध्ये काम करावे लागेल.

२९) एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज वेगवेगळ्या लिफाफ्यात करण्यांत यावा. स्वतंत्र लिफाफ्यात पदाचे नाव लिहून अर्ज सादर करावा. एकाच लिफाफ्यात एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज पाठविल्यास ते रद्द समजण्यांत येईल.

३०). **अर्ज पाठविताना ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाचे नाव लिफाफ्यावर ठळक हस्ताक्षरात नमूद करावे.**

३१) पोस्टाद्वारे विहित मुदतीनंतर कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी

३२) शासन निर्णय अ.नि.यो १००५/१२६/सेवा-४ दि. ३१/१०/२००५ प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहिल.

३३) निवड प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव आणणारा उमेदवार अपात्र ठरविला जाईल याची नोंद घ्यावी.

३४) उमेदवाराने अर्जावर चिकटविलेल्या फोटोव्यितिरिक्त अर्जासोबत स्वतःचा पासपोर्ट आकाराचे दोन फोटो अर्जास स्टेपल करुन जोडणे आवश्यक आहे. फोटोच्या मागे उमेदवाराने नाव पत्ता नमुद करुन सही करावी , तसेच उमेदवाराने अर्जासोबत १० सेमी X २२ सेंमी आकाराचा **स्वतःचा संपुर्ण पत्ता जवळच्या खुणेसह ( पिनकोडसह) लिहिलेला व रु, ५/- चे तिकीट लावलेला लिफाफा जोडणे आवश्यक आहे.**

**३५) व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,पुणे -१ यांनी कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज व त्यासाठी काहीही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.**

**३६) लेखी परिक्षेमध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक राहील.**

**३७) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.**

सही/-

व्यवस्थापक
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
महा. शासनाचे छायाचित्रण तज्ज्ञ,
पुणे.

# अर्जाचा नमुना
# शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
# ५ फायनान्स रोड, पुणे-१
(जाहिरात क्रमांक -३/२०१२)

| उमेदवाराचा अलीकडे काढलेला व स्वाक्षरित केलेला पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता

कार्यालयीन नोंदणी क्रमांक :

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक :

कार्यालयास प्राप्त दिनांक :

**(लिपिक टंकलेखक/बांधणीसाहयकारी या पदासाठी अर्ज)**

**पदाचे नाव –** ------------------------------------ **अंपगाकरिता अथवा मागासवर्गीय करिता अर्ज नमूद करावे**

| अ.क्र | उमेदवाराचे पूर्ण नाव | :- | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | | :- | (आडनाव) (स्वतःचे नाव) (वडीलांचे/पतीचे नाव) | | | | | |
| २) | अपंगत्वाचा प्रकार | :- | | | | | | |
| | | :- | स्वरुप अपंगत्वाची टक्केवारी - | | | | | |
| ३) | जात | | | | | | | |
| | प्रवर्ग | * | अ.ज | | भ.ज.क | | वि.मा.प्र | |
| ४) | पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता | :- | | | | | | |
| ५) | कायमचा पत्ता | :- | | | | | | |
| ६) | मोबाईल क्रमांक | :- | | | | | | |
| ७) | ई-मेल | :- | | | | | | |
| | लिंग | :- | | | | | | |
| | | :- | पुरुष/स्त्री | | | | | |
| ८) | जन्मदिनांक व वय | :- | | | | | | |
| ९) | जात | :- | | | | | | |
| १०) | मातृभाषा | :- | | | | | | |
| ११) | राष्ट्रीयत्त्व | :- | | | | | | |
| १२) | महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहेत काय ? | :- | | | | | | |
| १३) | शैक्षणिक/तांत्रिक पात्रता | :- | | | | | | |

* **प्रवर्गा समोर** √ खुण करावी. ( लागू नसेल तेथे लागू नाही असे नमूद करावे.)

| शैक्षणिक पात्रता | मंडळ/विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | एकूण मिळालेले गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| अ.क्र | प्रत्यक्ष काम केलेल्या संस्थेचे/ कार्यालयाचे नाव व पत्ता | कामाचा कालावधी | | धारण केलेले पद | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, प्रस्तुत पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत . मी अर्जामध्ये सादर केलेली सर्व माहिती खरी असून ती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी सदर पदाची उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल याची मला पूर्ण जाणीव आहे. याबाबत निवड समिती/नियुक्ती अधिकारी यांचा निर्णय मला बंधनकारक राहिल व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ :
दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

## विवाहित असल्यास लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र

मी, श्री/श्रीमती ........................................................ श्री ........................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ....... वर्षे राहणार .........................................................................................................याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी ........................................... या पदास माझा अर्ज दाखल केला आहे.
२) आज रोजी मला .................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००७ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या एवढी आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा).
३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे मी या पदास पात्र राहणार नाही याची मला जाणीव आहे.

स्थळ :
दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी व नाव